# Positive Story of Nagpur Rural Police

**दिनांक ०७/११/२०२५**

**नागपूर ग्रामीण पोलिसांनी अवैधरित्या गांजा विक्री करणारी टोळी आणि वर्चस्व निर्माण करून दहशत माजवणारी टोळी अशा गुन्हेगारांच्या २ टोळयांविरुद्ध महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (MCOCA)अन्वये कारवाई केलेली आहे.**

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांचे मार्गदर्शनात खापा येथील अंमली पदार्थ विक्री मधील सक्रीय ४ आरोपीतांच्या टोळीवर तसेच सावनेर येथील टोळीने गंभीर गुन्हे करणाऱ्या ३ अरोपीतांच्या टोळीवर महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ अन्वये कारवाई करण्यात आली आहे.

**पोलीस स्टेशन खापा** :— खापा पोलीसांनी अवैध अंमली पदार्थ गुन्हयामध्य तसेच ईतर गंभीर गुन्हयामध्ये सामील असलेल्या टोळीच्या प्रमुख तसेच सदस्य अशा एकुण ४ आरोपीतांविरुद्ध महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९(MCOCA) अन्वये कारवाई करण्यात आली आहे. सदर टोळीचा प्रमुख आरोपी नामे **१. गोलु उर्फ रामेश्वर देवशंकर वर्मा, वय ३३ वर्षे, रा.येरला ता.कळमेश्वर जि.नागपुर हा असुन टोळीतील सदस्य आरोपी क्रं २. मनीष देवशंकर वर्मा, वय २५ वर्षे, रा. येरला, ता. कळमेश्वर जि.नागपुर, आरोपी क्रं ३ ईश्वर गणपती पराते, वय ४४ वर्षे,रा. लांबटपुरा, खापा ता.सावनेर जि.नागपुर आणि एक महीला रा. खापा असे आरोपी आहे.**

सदर गुन्हयातील आरोपीतांचा गुन्हेगारी अभिलेख बघता,यातील टोळी प्रमुख १. गोलु उर्फ रामेश्वर देवशंकर वर्मा, रा.येरला ता.कळमेश्वर जि.नागपुर हा टोळीतील सदस्यांना अैवधरित्या गांजा पुरवठा करून त्यांना विक्री करीता उपलब्ध करून देत होता. तसेच नागरिकांमध्ये दहशत पसरविण्यासाठी घातक हत्यारांनी मारहाण करीत होता. तसेच अवैध जुगार च्या गुन्हयांमध्ये सुध्दा त्याचा सहभाग आहे.त्याचेवर मागील १० वर्षाच्या

काळामध्ये आतापर्यन्त पोलीस स्टेशन कळमेश्वर, खापा, खापरखेडा, हुडकेश्वर येथे १५ गुन्हे नोंद असुन त्यात अवैध हत्यार, साधी दुखापत, गंभीर दुखापत, अवैध जुगार, अवैध अंमली पदार्थ तस्करी अणि विक्री असे गुन्हे नोंद आहे. हे गुन्हे तो नवनवीन साथीदारांच्या मदतीने संघटित टोळी तयार करून संघटितपणे अथवा टोळीचा सदस्य म्हणुन एकटयाने करतो. टोळी सदस्य मनीष देवशंकर वर्मा, रा.येरला, ता. कळमेश्वर, जि. नागपुर हा टोळी प्रमुखाच्या सांगण्यावरून अंमली पदार्थ विक्री तसेच पुरवठा करीत होता. त्याचे वर गैरकायदयाची मंडळी जमविणे, धामकी, शिवीगाळ आणि अवैध अंमली पदार्थ असे गुन्हे नोंद आहे. टोळी सदस्य ईश्वर गणपती पराते, रा. लांबटपुरा, खापा, ता.सावनेर जि.नागपुर हा टोळी प्रमुखाच्या सांगण्यावरून अंमली पदार्थ विक्री करीत होता. तसेच त्याचे अवैध जुगार आणि अंमली पदार्थाच्या विक्री बाबत गुन्हे नोंद आहे. टोळी सदस्य महीला आरोपी ही टोळी प्रमुखाच्या सांगण्यावरून अंमली पदार्थ विक्री करीत होती. तिचे वर अवैध अंमली पदार्थ विक्री चे गुन्हे नोंद आहे.

वरील सर्व संघटित टोळीतील सदस्यांनी अवैधपणे साथीदारांच्या मदतीने अंमली पदार्थ गांजा ची विक्री करून स्वत:चे आर्थीक फायदा करण्याकरीता गुन्हेगारी क्षेत्रात दबदबा निर्माण करून सर्वसामान्य जनतेवर दडपण आणले आहे. या त्यांमुळे जनसामन्यात त्यांची दहशत निर्माण झाली आहे. टोळीतील टोळी प्रमुख हा सामान्य नागरीकांना शस्त्राचा धाक दाखवुन मारहाण करी होता. नमुद टोळी प्रमुख आणि सदस्यांच्या अशा कृत्यांना आळा घालण्यासाठी नमुद आरोपीतांविरूध्द वारंवार कारवाई करून त्यांचे वर गुन्हे नोंदवीले आहे तसेच त्याचे वर वेळोवेळी प्रतिबंधक कारवाई करण्यात आलेली आहे. तरीही त्याची गुन्हेगारी कृत्ये अद्याप सुरू आहेत. त्यांना कायद्याची कोणत्याही प्रकारची भिती राहीलेली नाही. यातील टोळी प्रमुख गोलु उर्फ रामेश्वर देवशंकर वर्मा, रा.येरला ता.कळमेश्वर जि.नागपुर अद्याप पर्यंतचे पोलीस स्टेशन खापा, खापरखेडा आणि हुडकेश्वर येथे १५ गुन्हे नोंद असुन त्याने त्याच्या संघटित टोळीच्या वेगवेगळया साथीदारांच्या मदतीने केले आहे.

नमुद टोळी प्रमुख गोलु उर्फ रामेश्वर देवशंकर वर्मा (टोळी प्रमुख) व त्याचे साथीदार (टोळी सदस्य) आरोपी मनीष देवशंकर वर्मा, आरोपी क्रं ३ ईश्वर गणपती पराते, आणि महीला आरोपी हे सर्व आरोपी संघटित गुन्हेगारी संघटनेचा सदस्य म्हणुन अशा संघटनेच्या वतीने एकटयाने किंवा संयुक्तपणे बेकायदेशीर कृत्य आणि गुन्हे करीत आहेत. आरोपीतांचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता वेळोवेळी त्याचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपीतांनी त्यांची गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. त्यामुळे नमुद ४ आरोपीतांच्या टोळी विरुद्ध महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ अन्वये कारवाई करण्यात आली आहे.

# 2 गैंग्स पर मोका

**नागपुर.** पुलिस अधीक्षक हर्ष पोद्दार ने जिले में सक्रिय 2 ड्रग्स तस्करी गिरोहों के खिलाफ महाराष्ट्र संगठित अपराध नियंत्रण अधिनियम (मकोका) के तहत बड़ी कार्रवाई की है. पहली गैंग के मुख्य सरगना येरला, तह. कलमेश्वर निवासी गोलू उर्फ रामेश्वर वर्मा और उसके भाई मनीष वर्मा, लांबटपुरा, खापा निवासी ईश्वर गणपति पराते और एक महिला साथी को मोका के तहत आरोपी बनाया गया है. यह गिरोह लंबे समय से खापा, कलमेश्वर, खापरखेड़ा और हुडकेश्वर थाना क्षेत्रों में मादक पदार्थों की तस्करी, अवैध शस्त्र रखना, मारपीट और जुआ अड्डे चलाने जैसे गंभीर अपराधों में लिप्त था. दूसरी गैंग में साईनगर, दहेगांव रंगारी निवासी प्रकाश थोरात, भीमनगर, खापरखेड़ा निवासी रोहित येवले और भानेगांव निवासी अमन पांडे शामिल हैं. प्रकाश इस गैंग का सरगना बताया गया है.

लोकमत
नागपूर, सोमवार, दि. १० नोव्हेंबर २०२५

# सात सराईत गुन्हेगारांवर 'मकोका'

## गांजा विक्रेत्या तिघांचा समावेश : नागपूर ग्रामीण पोलिसांची कारवाई

लोकमत न्यूज नेटवर्क

**नागपूर :** ग्रामीण भागात गांजा विक्रीत वाढ होत असताना याला आळा घालण्यासाठी नागपूर ग्रामीण पोलिसांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशान्वये गांजा विक्रेत्यांच्या टोळीतील चौघांसह अन्य तीन सराईत गुन्हेगारांवर 'मकोका' (महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम १९९९) अन्वये स्थानबद्ध केले. यात एका गांजा विक्रेत्या महिलेचा समावेश आहे.

ही कारवाई करण्यात आलेल्या सराईत गुन्हेगारांमध्ये गोलू ऊर्फ रामेश्वर देवशंकर वर्मा (३३), मनीष देवशंकर वर्मा (२५) दोघेही रा. येरला, ता. कळमेश्वर, ईश्वर गणपती पराते (४४, रा. लांबटपुरा, खापा, ता. सावनेर) या तिघांसह खापा शहरात राहणाऱ्या महिलेचा आणि प्रकाश विनायक थोरात (४२, रा. खापरखेडा, ता. सावनेर), रोहित शेखर येवले (३६, रा. भीमनगर, खापरखेडा, ता. सावनेर), अमन मोरेश्वर पांडे (२७, रा. उपासे ले-आउट, भानेगाव वॉर्ड, खापरखेडा, ता. सावनेर) या सात गुन्हेगारांचा समावेश आहे.

रामेश्वर, मनीष, ईश्वर व महिला मागील काही दिवसांपासून गांजा विक्री करायचे. विशेष म्हणजे, हे चौघेही खापा, सावनेर व कळमेश्वर पोलिस ठाण्यांच्या हद्दीतील किरकोळ गांजा विक्रेत्यांना नियमित गांजाचा पुरवठा करायचे. याच कारणामुळे त्यांच्यावर खापा व कळमेश्वर पोलिसांनी सुरुवातीला प्रतिबंधात्मक कारवाई केली. नंतर त्यांना अटकही करण्यात आली. जामिनावर सुटका झाल्यानंतर चौघेही गांजा विक्रीच करायचे. त्यामुळे खापा पोलिसांनी या चौघांवर मकोकाअंतर्गत कारवाई करण्याचा प्रस्ताव पोलिस अधीक्षक हर्ष पोद्दार यांच्यामार्फत जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांच्याकडे सादर केला. डॉ. विपीन इटनकर यांनी या आरोपींविरुद्धचे गुन्हे आणि त्यांच्या वर्तनाची चौकशी करीत प्रस्तावाला मंजुरी दिली.

प्रकाश, रोहित व अमन या तिघांची एक टोळी असून त्या तिघांवर सावनेर पोलिस ठाण्यात दरोडा टाकणे, चोरी अथवा लुटण्याच्या उद्देशाने प्राणघातक हल्ला चढवून जखमी करणे, अवैधरीत्या शस्त्र बाळगणे, नागरिकांना विनाकारण शिवीगाळ करीत मारहाण करणे व जीवे मारण्याची धमकी देणे, चोऱ्या करणे, खंडणी वसूल करणे यासह अन्य गंभीर गुन्ह्यांच्या नोंदी आहेत. त्यांच्या वर्तनात सुधारणा होत नसल्याने सावनेर पोलिसांनी त्यांच्यावर मकोकाअंतर्गत कारवाई करण्याचा प्रस्ताव पोलिस अधीक्षक हर्ष पोद्दार यांच्यामार्फत जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांच्याकडे सादर केला आणि डॉ. विपीन इटनकर यांनी चौकशीअंती त्या प्रस्तावाला मंजुरी दिली. त्यामुळे खापा आणि सावनेर पोलिसांनी या सातही गुन्हेगारांना वेगवेगळ्या ठिकाणांहून ताब्यात घत अटक केली आणि त्यांची तातडीने नागपूर शहरातील मध्यवर्ती कारागृहात नेऊन सोडले.




### १० गंभीर गुन्ह्यांची नोंद

प्रकाश, रोहित व अमन सराईत गुन्हेगार आहेत. या तिघांवर खापरखेडा पोलिस ठाण्यात अवैधरीत्या शस्त्र बाळगणे, दरोडा टाकणे, खुनाचा प्रयत्न करणे, गैरकायदेशीर मंडळी गोळा करणे, जुगार खेळणे, जुगार भरविणे अशा एकूण १३ गुन्ह्यांची तर घुग्गुस (जिल्हा चंद्रपूर) पोलिस ठाण्यात १० तसेच खापा, सावनेर व पारशिवनी पोलिस ठाण्यात प्रत्येकी पाच गंभीर गुन्ह्यांची नोंद आहे.

### गोलू हा टोळीप्रमुख

गोलू ऊर्फ रामेश्वर देवशंकर वर्मा हा गांजा पुरवठा व विक्रेत्यांच्या टोळीचा प्रमुख आहे. तो उर्वरित तिघांना गांजा आणून द्यायचा आणि तिघेही त्या गांजाचा ग्रामीण भागात पुरवठा करायचे. त्याच्या विरोधात मागील १० वर्षांत कळमेश्वर, खापा, खापरखेडा व नागपूर शहरातील हुडकेश्वर पोलिस ठाण्यात १५ गंभीर गुन्ह्यांची नोंद आहे. रामेश्वर व मनीष सख्खे भाऊ असून, ते लोकांना शिवीगाळ करून मारहाण करायचे. प्रसंगी जुगार अड्डेही चालवायचे.

# ड्रग्ज तस्करांच्या दोन टोळ्यांविरुद्ध मकोका

म. टा. प्रतिनिधी, नागपूर

पोलिस अधीक्षक हर्ष पोद्दार यांनी जिल्ह्यातील दोन ड्रग्ज टोळ्यांविरुद्ध महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यान्वये कारवाई केली.

खापा येथील कुख्यात अमली पदार्थ तस्कर गोलू ऊर्फ रामेश्वर देवशंकर वर्मा (वय ३३), त्याचा भाऊ मनीष देवशंकर वर्मा (वय २५, दोन्ही रा. येरला, ता. कळमेश्वर), ईश्वर गणपती पराते (वय ४४, लांबटपुरा, खापा) व त्यांची महिला साथीदार अशी मकोकाअंतर्गत कारवाई करण्यात आलेल्या टोळीतील सदस्यांची नावे आहेत.

या टोळीचा सूत्रधार गोलू असून तो व त्याच्या टोळीतील सदस्यांविरुद्ध खापा, कळमेश्वर, खापरखेडा, हुडकेश्वर पोलिस ठाण्याच्या हद्दीत अमली पदार्थविरोधी कायद्यासह शस्त्र बाळगणे, मारहाण करणे, जुगारअड्डा चालविणे आदींसह पंधरापेक्षा अधिक गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. यासह सावनेरमधील प्रकाश विनायक थोरात (वय ४२, रा. साईनगर, दहेगाव रंगारी), रोहित शेखर येवले (रा. भीमनगर, खापरखेडा) व अमन मोरेश्वर पांडे (वय २३, रा. भानेगाव) या टोळीविरुद्धही मकोकाअंतर्गत कारवाई केली.

प्रकाश हा या टोळीचा सूत्रधार आहे. या टोळीविरुद्ध सावनेर, खापा व खापरखेडा पोलिस ठाण्यांत तेरा गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत.



## डिझेल चोरांनाही दणका

महाराष्ट्रासह गुजरात व मध्य प्रदेशात ट्रकमधील डिझेल चोरी करणाऱ्या टोळीविरुद्धही भारतीय न्याय संहितेच्या १११ कलमान्वये संघटित गुन्हेगारीची कारवाई करण्यात आली. साबीर सरदार खान (वय ३८, रा. गडोरी, जि. साझापूर, मध्य प्रदेश), शेख असलम शेख इस्माइल पिंजारे (वय ४४, रा. राणीनगर, कामठी रोड), इसराइल ऊर्फ राजा मुज्जमिल याकूब (वय ४१, रा. उप्पलवाडी) व अन्य, अशी कारवाई करण्यात आलेल्या टोळीतील सदस्यांची नावे आहेत.